**कृपया प्रसिध्दीसाठी** **19 डिसेंबर 2008**

## चारकोप मेट्रो कारशेड च्या विरोधाचा संघर्ष तीव्र - नागरीकांचे ठिय्या आंदोलन

**मुंबई, शुक्रवार** : 'हम एक है, एक रहेंगे - चारकोप कारशेड होने नहीं देंगे' अशा घोषणा देत 10,000 नागरिकांनी आज चारकोप मेट्रो कारशेडच्या विरोधात ठिय्या-धरणे आंदोलन केले. बुधवार, 17 डिसेंबर रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पूर्वसूचना न देता केलेल्या सर्वेक्षणाला नागरिकांनी रस्त्यावर येऊन स्वयंस्फूर्त विरोध केला होता. त्या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय झोपडपट्टी बचाव समितीने आज ठिय्या-धरणे आंदोलनाची हाक दिली होती.

आंदोलकांसमोर बोलताना माजी रेल्वे मंत्री श्री.राम नाईक यांनी मेट्रो रेल्वेला विरोध नाही, असे सांगून मेट्रो कारशेड उपलब्ध मोकळ्या भूखंडावरच बांधण्यात यावी यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. तसेच मुख्यमंत्र्यांच्याबरोबर चर्चा झाल्याशिवाय सर्वेक्षण होऊ दिले जाणार नाही अशी घोषणा केली व तसा प्रयत्न मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दुराग्रहाने केलाच, तर त्यातून निर्माण होणा-या परिस्थितीला प्राधिकरणच जबाबदार राहील असा इशाराही दिला.

ठिय्या आंदोलकांसमोर भारतीय जनता पार्टीचे सर्वश्री विजय भाई गिरकर, जयप्रकाश ठाकूर, योगेश सागर, शिवसेनेचे विनोद घोसाळकर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे संदेश कोंडविलकर आणि शिवबहादुर यादव, इंदिरा कॉंग्रेसचे बहादुरसिंग यादव आणि अख्तर मलिक, समाजवादी पार्टीचे श्री.गिरिजाशंकर यादव, रिपब्लिकन पक्षाचे श्री.फतेमहंमद, बहुजन समाजवादी पक्षाचे श्री.रवि कदम, मनसेचे श्री.दिनेश साळवी, आदी नेत्यांची भाषणे झाली.

समितीचे अध्यक्ष श्री.बाबा सिंग यांनी प्रास्ताविक भाषण केले, तर श्री.संजय सिंह यांनी सूत्रसंचालन केले.

**(बाबा सिंह)**
**अध्यक्ष**
**मोबाईल क्र. 9323046896**